सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३९/४२/वृं.प./५१ वी सभा/१५१/२०१९ मुंबई, दिनांक :-१८/०९/२०२३

**विषय** :-सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी निवृत्तीवेतन व इतर लाभ मंजुरीचे प्राधिकारपत्र देण्याबाबत.

******

परिपत्रक :-

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व वेळोवेळी शासनाद्वारे निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरचे लाभ विहित वेळेत अदा करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषांगाने वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे-२०१४/प्र.क्र.३६/सेवा-४, दि.०२/०७/२०१५ व शासन परिपत्रक, क्र.संकीर्ण-२०१९/३९/प्र.क्र.१७/सेवा-७, दि.०९/०९/२०१९ निर्गमित करण्यात आला आहे. पोलीस विभागातील सेवानिवृत्त होणारे अधिकारी / कर्मचारी (नियमित / स्वेच्छासेवानिवृत्त / इतर कारणांमुळे) यांना निवृत्तीवेतनाचे लाभ संबंधित घटक प्रमुखांकडून देण्यात येतात. भा.पो.से अधिकारी यांना केंद्रीय अधिदान व लेखा कार्यालयाकडून (CPO) निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येते.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नियम १२० च्या तरतूदींनुसार निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे तयार करण्याच्या कार्यवाहीस **सेवानिवृत्तीच्या तारखेच्या दोन वर्ष** अगोदर सुरुवात करणे आवश्यक आहे. त्यासाठी **आस्थापना शाखेकडून** सेवापुस्तकाची पडताळणी करणेकामी सेवापुस्तक वेतन पडताळणी पथकास सादर करणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदी घेतलेले व वेतन पडताळणी पथकाकडून प्रमाणित झालेले सेवापुस्तक सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी किमान ६ महिने अगोदर आस्थापना शाखेने पेन्शन शाखेस पाठविणे आवश्यक आहे . निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रे पूर्ण करताना नियम १२१ च्या तरतूदीनुसार सेवेची पडताळणी करणे, सेवापुस्तकातील उणीवा भरुन काढणे, त्यांचे शासकीय येणे/वसूली, विभागीय चौकशी बाबतच्या माहितीची छाननी करणे , सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सर्व नामनिर्देशनांच्या (GIS,GPF,Gratuity,Family Pension इ.) विहीत नमुन्यात टक्केवारीनिहाय माहिती भरुन घेणे. तसेच कार्यालय प्रमुखाने सर्व नामनिर्देशनाच्या प्रती त्यांचे सेवापुस्तकामध्ये जोडून परिपूर्ण

सेवापुस्तक व कागदपत्रे नियम १२२ व १२३ च्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी **सहा महिन्यांच्या आंत** संबंधीत महालेखापालांकडे ऑनलाईन पाठविणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणांमध्ये महालेखापाल कार्यालयाकडून आक्षेप उपस्थित केले जातात, त्या प्रकरणांच्या आक्षेपांची पूर्तता संबंधीत कार्यालय प्रमुखाने १५ दिवसात पाठवावे. अशी प्रकरणे प्रलंबित राहिल्यास या संबंधातील सर्वोतपरी जबाबदारी विभाग /कार्यालय प्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

३. तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम व शासन निर्णयांचे काटेकोरपणे अनुपालन करुन निवृत्तीवेतन धारकांना वेळेवर निवृत्तीनंतरचे फायदे मिळण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी . तसेच निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक पडताळणीसाठी निवृत्ती दिनांकाच्या १ वर्ष अगोदर वेतन पडताळणीसाठी पाठविण्यात यावे जेणेकरुन संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाचे लाभ वेळेवर मिळणे शक्य होईल.

Signed by Nikhil
Jaiprakash Gupta
Date: 18-09-2023 16:13:39
Reason: Approved

(डॉ. निखिल गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त, (बृहन्मुंबई वगळून)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथकें, महाराष्ट्र राज्य, मुंबई, गु.अ.वि.पुणे/ रा.रा.पो.बल,मुंबई/वाहतूक,मुंबई
अपर पोलीस महासंचालक व संचालक दळणवळण व परिवहन,म.रा.,पुणे/म.पो.अकादमी, नाशिक/ महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे/ रा.रा.पो.बल, पुणे व नागपूर /वि.सु.वि., दादर/ ना.ह.सं./महिला अत्याचार प्रतिबंध विभाग,पुणे /न.वि.अ., नागपूर.
पोलीस उपमहानिरीक्षक,गडचिरोली परिक्षेत्र,कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक [ जिल्हे /लोहमार्ग / बिनतारी संदेशसह ]
सर्व प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र . १ ते १९

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.

प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता-

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२, ३, ४, ५ व ८

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १६

२/-यांचेकार्यालयीनज्ञापक्र.पोमसं/१६/३६९९/कवृंप-

५४ वीसभा/४८/२०१६,दि.११/०७/२०२३ वदि.१०/०८/२०२३ ला अनुसरुन

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. महाराष्ट्र राज्य मुंबई

२. सदरहु परिपत्रक www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर पुढील २ महिन्यासाठी ठेवण्यात यावे.